**पोलीस उप-आयुक्त, वाहतुक शाखा यांचे कार्यालय,**
**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ, पुणे-४११००६**

जा.क्रं. पोउआ/वाहतूक/नियोजन/पुणे/१४०७ /२०२४ दिनांक :- २१ /०२/२०२४

# <u>प्रसिध्दीपत्रक</u>

सध्या पुणे शहरामध्ये विविध ठिकाणी रस्ते दुरुस्तीची, मेट्रोची व पुलाची कामे चालू आहेत. त्यामुळे वाहतूक संथ गतीने होत आहे व अनेक ठिकाणी वाहतूक कोंडी होत असल्याचे दिसुन येत आहे.

दि. २१/०२/२०२४ पासून इयत्ता १२ वी ची परिक्षा सुरु झाली असुन त्यानंतर इयत्ता १० वी ची परिक्षा सुरु होणार आहेत. पुणे शहरामध्ये शाळा, कॉलेजची संख्या जास्त असल्याने मोठया प्रमाणात विदयार्थी परिक्षेसाठी जाणार आहेत. सर्व विदयार्थी व पालक यांना आवाहन करण्यात येते की, परिक्षा केंद्रावर विदयार्थ्यांना पोहचण्यास उशीर होऊन नये म्हणुन संभाव्य वाहतूक कोंडी लक्षात घेवुन घरातून लवकरात लवकर निघावे जेणेकरुन विदयार्थ्यांचा प्रवास सुरक्षित व सुरळीत होऊन त्यांना परिक्षा केंद्रावर वेळेत पोहचता येईल.

तरी आपण वेळेत निघावे असे वाहतूक शाखा, पुणे शहर पोलीस यांचेकडुन आवाहन करण्यात येत आहे.

सर्व विदर्यार्थ्यांना परिक्षेसाठी शुभेच्छा..

21.2.24

(शशिकांत बोराटे)
पोलीस उप-आयुक्त,
वाहतूक शाखा,पुणे शहर